सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६६ | गुरुवार, दि. १८ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४९२००

२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३८०००

१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११४७००

शुद्ध चांदी ९९९% : ₹ २५००/-

भाव प्रती १० ग्राम

अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती

**दैनिक बाजार भाव**

| प्रकार | भाव | |
|---|---|---|
| | कमी | जास्त |
| गहू | २२८१ | २३९६ |
| बाजरी | २२५० | २२९९ |
| दादर | २८०० | ४१०० |
| हा.ज्वारी | २३०० | २३४० |
| मका लाल | १९०० | २२०० |
| मुंग | ७७३५ | ७७८८ |
| उडीद | -- | ६३०० |
| हरभरा काबुली व्ही.टू. | ५६५० | ५८५० |
| हरभरा गावराणी | ५१०० | ५२०० |
| हरभरा गुलाबी | ५२०० | ५३०० |
| हरभरा चापा | ५३०० | ५४०० |
| हरभरा डॉलर सफेद | ७००० | ७३०० |
| हरभरा गुल्लर | -- | -- |
| चवळी | -- | -- |
| तूर | ६९५१ | ७००० |
| शेंगा | -- | -- |
| तीळ | ९५११ | ९६८१ |
| सोयाबीन | -- | -- |
| सूर्यफुल | -- | -- |
| धणे | -- | -- |
| जिरे | -- | -- |
| पांढरी तूर | -- | -- |




**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यवस्थापन समिती

# अमळनेरच्या वेदांशू पाटील यांची सदस्यपदी नियुक्ती

## डॉ. डिगंबर महाले यांचीही गव्हर्निंग कौन्सील सदस्यपदी बिनविरोध निवड



डॉ. डिगंबर महाले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार, कृषी व उद्योजक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शतकोत्तर परंपरा लाभलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चर (एमएसीसीआयए) च्या व्यवस्थापन समिती सदस्यपदी उद्योजक वेदांशू पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी आपल्या विशेष अधिकारातून ही नियुक्ती केली असून, चेंबरच्या शतक महोत्सवी वर्षात झालेल्या या नियुक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, अमळनेर येथील मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांची देखील गव्हर्निंग कौन्सील सदस्यपदी बिनविरोध निवड झाली आहे, हे विशेष! गेल्या वर्षी डॉ. महाले यांचे एकूण कार्य व दीर्घ अनुभव लक्षात घेऊन संस्थेने त्यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती केली होती. सदर पदी नियुक्त होणारे ते तालुक्याच्या इतिहासातील पहिलेच सदस्य होते.

महाराष्ट्र चेंबरची व्यवस्थापन समिती ही संस्थेतील सर्वोच्च धोरणात्मक निर्णय घेणारी समिती आहे. या समितीत अध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, विविध विभागांचे उपाध्यक्ष, माजी अध्यक्ष, ट्रस्ट बोर्ड चेअरमन, सेक्रेटरी जनरल यांचा समावेश असतो. महाराष्ट्र चेंबरच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे, संस्थेच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेणे आणि भावी दिशा निश्चित करणे ही या समितीची प्रमुख जबाबदारी असते.

विशेष म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातून अध्यक्षांच्या विशेष अधिकारातून केवळ एका सदस्याची या समितीवर नियुक्ती केली जाते. यंदा ही जबाबदारी वेदांशू पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. वेदांशू पाटील हे गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टिंग, शिक्षण, मनोरंजन तसेच ई-कॉमर्स अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेले युवा उद्योजक म्हणून ओळखले जातात. विविध व्यवसाय क्षेत्रांतील त्यांचा अनुभव, संघटन कौशल्य आणि उद्योजकीय दृष्टिकोन लक्षात घेऊन त्यांची निवड करण्यात आल्याचे समजते.

महाराष्ट्र चेंबरच्या जवळपास शंभर वर्षांच्या इतिहासात व्यवस्थापन समितीवर नियुक्त झालेल्या सदस्यांपैकी सर्वांत तरुण सदस्य म्हणून वेदांशू पाटील यांची नोंद होणार असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे या नियुक्तीकडे उद्योग व व्यापारी क्षेत्रात विशेष उत्सुकतेने पाहिले जात आहे. अलीकडेच पार पडलेल्या २०२६-२८ च्या निवडणुकीत अध्यक्ष रवींद्र माणगावे यांची बिनविरोध निवड झाली असून, राज्यातील सर्व उपाध्यक्ष आणि सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य यांची बिनविरोध तर काहींची निवडणुकीद्वारे विजय प्राप्त करून एकहाती सत्ता प्रस्थापित झालेली आहे. या पार्श्वभूमीवर नव्या नेतृत्वासोबत युवा उद्योजकांना संधी देण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना वेदांशू पाटील यांनी अध्यक्ष रवींद्र माणगावे, ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, वरिष्ठ उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी तसेच महाराष्ट्र चेंबरच्या सर्व नेतृत्वाचे आभार मानले. महाराष्ट्र चेंबरच्या विकासासाठी, सभासदांच्या हितासाठी आणि संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षात नवे उपक्रम राबविण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र चेंबरच्या शतक महोत्सवी वाटचालीत युवा नेतृत्वाचा सहभाग वाढविण्याच्या दिशेने ही नियुक्ती एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात असून, उद्योग-व्यापार क्षेत्रात नव्या पिढीच्या प्रतिनिधित्वालाही यामुळे बळ मिळणार आहे.



*अमळनेर : महाराष्ट्र चेंबरच्या व्यवस्थापन समितीवर वेदांशू पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करताना अध्यक्ष रवींद्र माणगावे. शेजारी ट्रस्ट बोर्ड चेअरमन पेडणेकर, माजी अध्यक्ष मंडलेचा, वरिष्ठ उपाध्यक्ष शेट्टी.*

## कौतुक दातृत्वाचे..!



*अमळनेर : सामाजिक बांधिलकी जपत नुकतीच मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन त्यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २१ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करताना मूळचे जळगाव जिल्ह्यातील रहिवासी व हल्ली मुंबईस्थित यशस्वी युवा उद्योजक तेजस मोरे. या दातृत्वाबद्दल मा. ना. श्री. फडणवीस यांनी मोरे यांचे विशेष कौतुक केले.*

# अमळनेरमध्ये आरटीई विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक?

## सायरादेवी बोहरा स्कूलवर गंभीर आरोप; विविध स्तरांवर तक्रारी दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक असताना येथील सायरादेवी बोहरा स्कूल येथे आरटीई विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शालेय साहित्य, पुस्तके, गणवेश व इतर बाबींच्या नावाखाली सुमारे सात-सात हजार रुपये वसूल केले जात आहेत, असा गंभीर आरोप पालकांकडून करण्यात आला आहे. या




प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र संतापाची भावना असून शिक्षण विभागाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

महाराष्ट्र शासनाने शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांकडून गणवेश, पुस्तके, शालेय साहित्य अथवा इतर कोणत्याही कारणासाठी शुल्क आकारण्यास स्पष्ट मनाई केली आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी देखील शासनाच्या आदेशानुसार

पान २ वर




# निवृत्त बँक कर्मचाऱ्याने २५.५१ लाख रु. दिले सैन्याला

## पत्नीसोबतच्या जगभ्रमंतीचे स्वप्न अपूर्ण राहिल्याने घेतला हा निर्णय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नागपूर येथील ७० वर्षीय निवृत्त बँक कर्मचारी श्रीकांत सहस्रबुद्धे यांनी २५ लाख ५१ हजार रुपये 'आर्मी सेंट्रल वेल्फेअर फंड'साठी दान केले आहेत. त्यांनी उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात सब एरियाचे जनरल ऑफिसर कमांडिंग, मेजर जनरल नवतेज एस. सोहल (सेना पदक) यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द केला.

या दानामागे एक भावनिक पार्श्वभूमी आहे. श्रीकांत सहस्रबुद्धे यांनी ही रक्कम स्वतःसाठी आणि त्यांच्या पत्नी अंजली सहस्रबुद्धे यांच्यासाठी बाजूला ठेवली होती. निवृत्तीनंतर पत्नीसोबत जगभ्रमंती करण्याचे या दांपत्याचे स्वप्न होते, ज्यासाठी त्यांनी आयुष्यभर



बचत केली होती.

मात्र, श्रीकांत यांच्या निवृत्तीच्या अवघ्या सहा महिने आधी त्यांच्या पत्नीचे निधन झाले. यामुळे जगभ्रमंतीचे त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले. श्रीकांत यांची मुले आपापल्या आयुष्यात स्थिरावलेली आहेत. पत्नीच्या निधनानंतर या पैशांचा विनियोग कसा करावा, यावर सहस्रबुद्धे कुटुंबीयांनी विचार केला. अखेर, ज्या पैशांनी स्वतःचे स्वप्न पूर्ण होणार नव्हते, त्या पैशांनी देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या कुटुंबांना मदत करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

श्रीकांत सहस्रबुद्धे म्हणाले, माझी मुले व्यवस्थित स्थिरावलेली आहेत. त्यामुळे आम्ही सर्वांनी मिळून हा पैसा एका पवित्र आणि सत्कार्यासाठी वापरण्याचा निर्णय घेतला. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांपेक्षा मोठे कार्य दुसरे काय असू शकते?

श्रीकांत सहस्रबुद्धे यांनी दान केलेला हा निधी 'आर्मी सेंट्रल वेल्फेअर फंड'मध्ये जमा करण्यात आला आहे. देशाचे रक्षण करताना शहीद झालेल्या जवानांच्या परिवारासाठी (वीरनारी), दिव्यांग सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आणि कर्तव्यावर असलेल्या जवानांच्या कल्याणासाठी या निधीचा उपयोग केला जातो.

## संपादकीय

# काळच काय ते ठरवेल...

राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्ताने शरद पवार यांनी केलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्यावर प्रचंड स्तुतिसुमने उधळली आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला काँग्रेस पक्षात विलीन करण्याचे आवाहन काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी केल्याचे बोलले जाते. शरद पवार यांची राष्ट्रवादी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत विलीन होणार होती. तशी बोलणीही सुरू होती, असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील अनेक नेत्यांनी अजितदादा पवार यांच्या मृत्यूपश्चात बोलून दाखविले होते. मात्र, तसे काही सुरू असल्याबाबत अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांनी कानावर हात ठेवले. भाजपने दिलेल्या चिमुकल्या सत्तेत पुन्हा नवे वाटेकरी कशाला, आधीच आम्ही पुरवून पुरवून कसेबसे जगतोय; त्यात पुन्हा नवी तोंडे आली की राजकीय संसार कसा चालायचा, असाच सूज्ञ विचार त्यामागे असावा. स्वतःच स्थापन केलेला पक्ष ज्यांनी फोडला, त्यांच्याच सोबत जाता जाता, ज्या पक्षातून राजकीय कारकिर्दीची सुरूवात केली त्या मूळ काँग्रेस पक्षानेच आता 'या चिमण्यांनो परत फिरा रे' अशी साद शरद पवारांना घातली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत सुरू होण्याची चिन्हे आहेत. शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस हा काँग्रेस पक्षात विलीन होईल किंवा कसे, याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका त्यांच्या नेत्यांनी घेतलेली नसली तरी असे होणारच नाही, असेही ठामपणे म्हटलेले नाही. किंबहुना पवार यांचे नातू रोहित पवार यांनी त्याबाबत असे होऊही शकते, असे म्हटले आहे.

दुसरीकडे पवार यांचे राजकीय मित्र संजय राऊत यांच्या, शरद पवार यांनी काँग्रेस मजबूत करावी, या न मागता दिलेल्या सल्ल्यावर पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांनीही राऊत यांना मोठे बंधू म्हणत सन्मानच दिला असून काळच काय ते ठरवेल, असे म्हटले आहे. पंडित नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलनाच होऊ शकत नाही, असे म्हणत पवार यांनी इंदिरा गांधी व राजीव गांधी यांनी देशासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून दिली. मात्र १९९९ मध्ये देशाचे पंतप्रधानपद, राष्ट्रपतिपद व उपराष्ट्रपतिपद हे देशातच जन्मलेल्या व्यक्तीकडे असावे, असे जे पत्र शरद पवार यांनी सोनिया गांधी पंतप्रधान होऊ शकतात या भीतीने काँग्रेस कार्यकारिणीला लिहिले होते, त्या भूमिकेत बदल झाला आहे का? कारण सोनिया गांधी या आजही काँग्रेस पक्षात कार्यरत असून, त्या अधिकृतरीत्या पक्षाच्या अध्यक्ष नसल्या तरी त्याच काँग्रेस पक्षातील सर्वोच्च सत्ताकेंद्र आहेत. दुसरीकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून बाहेर पडलेल्या अजित पवार यांच्या पक्षाची सूत्रे त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार व पुत्र पार्थ पवार यांच्या हातात गेली आहेत. सुनेत्रा व पार्थ पवार हे दोघेही राजकारणात नवखेच म्हणायला हवेत. घरातच राजकारण असल्याने राजकीय डावपेचांबाबत ते अनभिज्ञ नसले तरी राजकारणाच्या आखाड्याबाहेरून डावपेच बघणे व प्रत्यक्षात तसे डाव रचणे व विरोधकांचे डाव हाणून पाडणे वेगळे.

राष्ट्रवादी काँग्रेसची राष्ट्रीय कार्यकारिणी दोन वेळा बदलल्याचे पत्र निवडणूक आयोगाला सुनेत्रा पवार यांच्या स्वाक्षरीने दिले गेले. त्यात प्रफुल्ल पटेल यांच्याकडून राष्ट्रीय कार्याध्यक्षपद काढून घेतल्याचे समोर आले. पटेल व तटकरे हे अजितदादा पवार यांचा पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेते अजितदादा पवार यांच्या मृत्यूनंतर काही दिवसांतच करू लागले होते. प्रफुल्ल पटेल यांचे कार्याध्यक्षपद काढून घेतल्यामुळे या आरोपांना पुष्टी मिळाली. मात्र काही दिवसांपूर्वीच स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातील विधान परिषदेवर अनिकेत तटकरे यांची उमेदवारी व राज्यसभेवर प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय राजेंद्र जैन यांची वर्णी लावून या दोघांशी तह झाल्याचे चित्र सुनेत्रा व पार्थ पवार यांनी निर्माण केले. मात्र सुनेत्रा पवार यांनी त्यांच्या राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनाला पक्षात अनावश्यक हस्तक्षेप खपवून घेणार नाही, असा सज्जड इशाराही दिल्याने अजूनही सारे काही आलबेल नाही, हेच समोर आले. एकंदरीत काँग्रेसमधून फुटून निर्माण झालेला राष्ट्रवादी पक्ष व त्यातून फुटून तयार झालेला दुसरा राष्ट्रवादी पक्ष या दोन्हींचे भवितव्य नक्की काय, या प्रश्नाचे उत्तर सुप्रिया सुळे यांच्या म्हणण्याप्रमाणे 'राजकारणात पुढे काय होणार हे काळच ठरवेल' हेच आहे!

## अमळनेरमध्ये आरटीई विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक?

आरटीई विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पूर्णपणे मोफत देण्याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. असे असतानाही अमळनेरमध्ये शासन आदेशांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार शाळेकडून केवळ आर्थिक मागणीच केली जात नाही, तर पालकांना वर्गशिक्षकांना भेटण्यासही मज्जाव केला जातो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत माहिती घेण्यासाठी गेलेल्या पालकांना 'क्लासटीचरला भेटता येणार नाही', 'आमच्याकडे अशी परवानगी नाही', 'तुमच्याने जे होईल ते करा' अशा प्रकारची अरेरावीची भाषा वापरून परत पाठविले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे या संपूर्ण प्रकरणाबाबत पालकांनी केवळ स्थानिक स्तरावरच नव्हे; तर राज्यस्तरापर्यंत तक्रारी दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भात शिक्षणमंत्री भुसे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती अमळनेर, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद जळगाव, शिक्षण उपसंचालक तसेच शिक्षण संचालक, महाराष्ट्र यांच्याकडे लेखी तक्रारी सादर करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तातडीने चौकशी करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

आरटीई कायद्याचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र काही शिक्षण संस्था शासनाकडून प्रतिपूर्ती मिळत असतानाही पालकांकडून हजारो रुपये उकळत असतील, तर हा प्रकार केवळ नियमभंग नसून गरीब पालकांच्या हक्कांवर गदा आणणारा असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. पालकांनी संबंधित व्यवहारांची चौकशी करून विद्यार्थ्यांकडून घेतलेली रक्कम परत मिळावी, दोषी अधिकारी व संस्थाचालकांवर कारवाई व्हावी आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा, अशी मागणी केली आहे. शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर आवश्यक असल्यास मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी जोर धरत आहे. आता राज्यातील वरिष्ठ शिक्षण अधिकारी आणि शिक्षण विभाग या गंभीर आरोपांची कितपत दखल घेतात, याकडे अमळनेर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. जर आरोपांमध्ये तथ्य आढळले, तर हे प्रकरण जिल्ह्यातील आरटीई अंमलबजावणीतील मोठे प्रकरण ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आज गुरुपुष्यामृत योग–विनायक चतुर्थी महासंयोग!

## रात्री करा 'हा' उपाय; दूर होतील तीन मोठ्या समस्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सनातन धर्मात गुरुपुष्यामृत योगाला अत्यंत पवित्र आणि सर्व सिद्धी देणारा योग मानले गेले आहे. यंदा गुरुवार, दि. १८ जून रोजी हा अतिशय शुभ असा 'गुरुपुष्यामृत योग' येत असून, याच दिवशी 'विनायक चतुर्थी' देखील साजरी केली जाणार आहे. ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक ज्योतिषी अरुणकुमार व्यास यांच्या मते या दिवशी चंद्रमा आणि गुरु यांच्या शुभ संयोगाने कर्क राशीत 'गजकेसरी योग' तयार होत आहे.

हा योग इतका शक्तिशाली आहे, की या काळात केलेली देवपूजा, मंत्रजाप आणि ज्योतिषीय उपाय त्वरित फलद्रुप होतात, अशी धार्मिक मान्यता आहे. जर तुमच्या आयुष्यात अनेक दिवसांपासून काही अडचणी सुरू असतील किंवा एखादी इच्छा अपूर्ण असेल, तर १८ जूनच्या रात्री कच्चे दूध, हळद आणि साखर यांचा एक छोटासा चमत्कारी इच्छापूर्तीचा उपाय तुमच्या आयुष्याला नवी दिशा देऊ शकतो.

रात्री ८ ते १२ दरम्यान करायचा 'हा' १ चमत्कारी इच्छापूर्तीचा उपाय

हा उपाय तुम्हाला १८ जून रोजी रात्री ८ ते १२ या वेळेत करायचा आहे.

कृती : एका छोट्या ग्लासमध्ये थोडे कच्चे (न तापवलेले) दूध घ्या. त्यात चिमूटभर हळद आणि चिमूटभर साखर मिसळा.

नियम आणि संकल्प : हे दूध पित असताना तुमचे डोळे मिटून मनात पूर्ण सकारात्मकता ठेवा. तुमच्या आयुष्यातील ३ मोठ्या समस्या आता पूर्णपणे दूर झाल्या आहेत आणि तुमच्या ३ इच्छा साक्षात भगवंताच्या कृपेने पूर्ण झाल्या आहेत, अशी दृढ भावना मनात आणा आणि ते दूध प्राशन करा.

उपाय करताना '३' या अंकाचे आणि साहित्याचे महत्त्व काय?

ज्योतिषशास्त्रानुसार या उपायात वापरलेले तिन्ही घटक वेगवेगळ्या ग्रहांचे प्रतिनिधित्व करतात आणि ते थेट तुमच्या ३ समस्यांवर काम करतात.

१) हळद (देवगुरू बृहस्पतीचे प्रतीक) : हळद ही गुरू ग्रहाशी संबंधित आहे. दुधात हळद टाकून प्यायल्याने कुंडलीतील गुरू बलवान होतो. ज्यामुळे तुमच्या भाग्यात येणाऱ्या सर्व अडचणी, करिअरमधील अडथळे दूर होतात आणि भाग्योदय होतो.

२) साखर (शुक्र ग्रहाचे प्रतीक) : साखर ही सुख-समृद्धीचा कारक असलेल्या शुक्र ग्रहाशी संबंधित आहे. साखरेच्या वापरामुळे मनातील अनामिक भीती, ताणतणाव दूर होतो आणि मन अत्यंत शांत व प्रसन्न बनते.

३) कच्चे दूध (चंद्र ग्रहाचे प्रतीक) : दूध हे थेट मनाचा कारक असलेल्या चंद्राचे प्रतीक आहे. कच्चे दूध प्यायल्याने मनातील द्विधा मनःस्थिती (Confusion) नष्ट होते, मानसिक स्थिरता लाभते आणि व्यक्तीला यशाचा अचूक मार्ग दिसू लागतो.




## शतकातील सर्वांत धोकादायक; एकाच मुलाचा हट्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या शतकातील सर्वांत धोकादायक महामारी एखादा विषाणू नसेल. ती आहे एकुलत्या एक मुलाची महामारी. दोन पालक, चार आजी-आजोबा आणि संपूर्ण वंशाच्या अपेक्षांचे ओझे वाहणारे ते एकुलते एक मूल. गजबजलेल्या बालपणाऐवजी शांत घरांमध्ये वाढणारे ते एक मूल. ना भावंडांची भांडणे. ना गुपितांची देवाणघेवाण. ना आयुष्यासाठी हक्काचा, रक्ताचा मित्र. फक्त स्क्रीन, परिपूर्णतेचा दबाव, एकटेपणा आणि 'आधुनिक सुखसोयीं'च्या नावाखाली दडलेले भावनिक विलगीकरण.

पूर्वीच्या पिढ्यांकडे पैसे कमी होते, पण माणसे जास्त होती. आजच्या पिढीकडे गॅझेट्स भरपूर आहेत, पण मानवी बंध मात्र कमी आहेत. ते एकुलते एक मूल म्हणजे कुटुंबाची आशा, निवृत्तीनंतरचा आधार, भावनिक आधारस्तंभ आणि वारसा हे सर्व काही एकाच वेळी असते. आणि जेव्हा ते मूल मानसिकदृष्ट्या कोलमडते, तेव्हा संपूर्ण घर शांतपणे कोसळते. समाज केवळ अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानावर टिकत नाही. तो टिकतो चुलत भावंडांवर, सख्ख्या भावंडांवर, जेवणाच्या टेबलावर होणाऱ्या गोंधळावर, सामायिक जबाबदाऱ्यांवर आणि आई-वडील गेल्यानंतरही पाठीशी उभे राहणाऱ्या माणसांवर. खरी शोकांतिका घटता जन्मदर नाही. ती आहे घटत जाणारा मानवी संवाद. आपण हळूहळू अशा पिढ्या घडवत आहोत ज्यांना प्रत्येक उपकरण कसे वापरावे हे माहीत आहे. पण दुःख कसे वाटावे, मतभेद कसे पचवावे, नाती कशी जपावीत किंवा कुटुंबाला एकत्र कसे घेऊन चालावे, हे माहीत नाही. माणसांनी भरलेले घर कधीही दरिद्री नव्हते. कधी-कधी, तीच खरी 'संस्कृती' होती.

## मुंढेंचे रक्त काढून राज्यातील इतर विभागप्रमुखांना द्या म्हणजे...; माजी मंत्री सुबोध सावजी यांचे मुख्य सचिवांना पत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभाग (एफडीआय) अचानक ॲक्शन मोडवर आला असून, गेल्या महिनाभरात कारवाईचा धडाकाच लागला आहे. त्यामुळे अवैध गुटखा विक्रेते, अन्न पदार्थांत भेसळ करणारे, हॉटेलवाले आणि मेडिकवाल्यांचेही धाबे दणाणले आहेत. कारण तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून जोरदार कारवाईचा धडाका सुरू केला आहे. मुंढेंच्या या कारवाईचे राज्यभरातून स्वागत होत असून शेतकऱ्यांकडूनही त्यांच्या कामाला कौतुक करत चक्क त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आल्याचे



पाहायला मिळाले. मात्र, आता बुलडाणा जिल्ह्यातील नेते आणि माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून वेगळीच मागणी केली आहे.

महाराष्ट्रात कायदेशीर आदेशाची अंमलबजावणी मुंढे करत आहेत आणि त्यांच्या कारवाईमुळेच भ्रष्टाचार व भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. राज्यात सध्या भेसळखोर आणि भ्रष्टाचाराला आळा बसत आहे. मुंढे ज्याप्रमाणे काम करत आहेत तसंच काम आपणांसह सर्व खातेप्रमुखांनी करावे, अशी जनतेची भावना आहे. मात्र, तसे होताना दिसत नाही. त्यामुळे मुंढे यांचे एक बाटली रक्त काढून ते थोडे थोडे आपणासह राज्यातील सर्व खातेप्रमुखांना द्यावे, अशी मागणी श्री. सावजी यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडे केली आहे

मुंढे यांचे एक बाटली रक्त काढून ते थोडे थोडे आपणासह राज्यातील सर्व खाते प्रमुखांना द्यावे. जेणेकरून त्यांच्यासारखी काम करण्याची प्रेरणा व कार्यक्षमता निर्माण होऊन महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् होईल. ज्याप्रमाणे अशक्त रुग्णाला रक्ताची बॉटल देऊन बरे करण्यात येत त्याचप्रमाणे मुंढे यांचे रक्त देऊन आपणासह सर्व राज्यातील खातेप्रमुखांना काम करण्याची शक्ती मिळेल, अशा शब्दांत राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना पत्र लिहून श्री. सावजी यांनी खोचक टोला लगावला आहे.

**शासकीय विभागप्रमुखांना रक्त द्यावे : सावजी**

अशक्त रुग्णाला सशक्त रुग्णाचे रक्त देऊन बरे करण्यात येते. त्यामुळे तुकाराम मुंढेंचे रक्त राज्यातील सर्वच शासकीय प्रमुखांना द्यावे, म्हणजे मुंढेंसारखे काम करण्याची प्रेरणा आणि शक्ती राज्यातील सर्वच विभागाच्या खातेप्रमुखांना मिळेल, असेही श्री. सावजी यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे सध्या त्यांचे हे पत्र सोशल मीडियातूनही व्हायरल होत आहे.

# शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाचे अजरामर प्रतीक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की त्यांचे नाव उच्चारताच पराक्रम, त्याग आणि राष्ट्रनिष्ठा यांचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे राणी लक्ष्मीबाई. १८ जून हा त्यांचा स्मृतिदिन. या दिवशी संपूर्ण देश त्यांच्या शौर्यपूर्ण कार्याला आणि बलिदानाला कृतज्ञतेने अभिवादन करतो.

राणी लक्ष्मीबाई या १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील अग्रगण्य नेत्या होत्या. ब्रिटीश सत्तेविरुद्ध त्यांनी दाखविलेला अदम्य संघर्ष भारतीय जनमानसाला आजही प्रेरणा देत आहे. त्यांच्या जीवनाचा प्रवास हा केवळ एका राणीचा इतिहास नसून अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या जिद्दीचा आणि स्वाभिमानाचा प्रेरणादायी आदर्श आहे.

**बालपण आणि घडण**

राणी लक्ष्मीबाई यांचे मूळ नाव मणिकर्णिका तांबे होते. त्यांचा जन्म वाराणसी येथे झाला. बालपणापासूनच त्यांना घोडेस्वारी, तलवारबाजी, धनुर्विद्या आणि युद्धकलेचे प्रशिक्षण मिळाले. त्या काळातील सामाजिक संकेतांपेक्षा वेगळे आणि धाडसी असे त्यांचे संगोपन झाले. त्यामुळे लहान वयातच त्यांच्यात नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि लढाऊ वृत्ती विकसित झाली.

झाशी संस्थानचे राजा गंगाधरराव यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या झाशीच्या राणी बनल्या. पतीच्या निधनानंतर त्यांनी दामोदरराव यांना दत्तक घेतले. मात्र ब्रिटिशांच्या 'डॉक्ट्रिन ऑफ लॅप्स' धोरणानुसार दत्तक वारस मान्य करण्यास नकार देत झाशी संस्थान खालसा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अन्यायाविरुद्ध राणी लक्ष्मीबाईंनी ठाम भूमिका घेतली.

**१८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील नेतृत्व**

१८५७ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध उठाव सुरू झाल्यानंतर झाशी हे बंडाचे महत्त्वाचे केंद्र बनले. या कठीण परिस्थितीत राणी लक्ष्मीबाईंनी प्रशासनाची सूत्रे हाती घेतली आणि सैन्याची पुनर्बांधणी केली. त्यांनी महिला आणि पुरुष अशा दोन्ही घटकांना संघटित करून झाशीच्या संरक्षणासाठी सज्ज केले. त्यांच्या नेतृत्वाखाली झाशीच्या किल्ल्याने ब्रिटिश सैन्याला दीर्घकाळ कडवी झुंज दिली.




राणींचे वैशिष्ट्य म्हणजे त्या केवळ राजकीय नेत्या नव्हत्या, तर प्रत्यक्ष रणांगणावर उतरून लढणाऱ्या योद्धा होत्या. संकटसमयी त्यांनी सैनिकांचे मनोबल उंचावले आणि स्वतः आघाडीवर राहून युद्धाचे नेतृत्व केले. त्यांच्या धैर्यामुळे हजारो सैनिकांना प्रेरणा मिळाली.

**अद्वितीय शौर्य आणि स्वाभिमान**

राणी लक्ष्मीबाई यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्वाभिमान. 'मी माझी झाशी देणार नाही' ही त्यांची भूमिका भारतीयांच्या मनात आजही अढळ आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या प्रबळ शक्तीसमोर झुकण्याऐवजी त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. झाशीचा किल्ला वेढला गेल्यानंतर त्यांनी धाडसी पलायन करून इतर क्रांतिकारकांशी हातमिळवणी केली. पुढे कालपी आणि ग्वाल्हेर येथेही त्यांनी ब्रिटिश सैन्याविरुद्ध युद्ध केले. रणभूमीवर तलवार हाती घेऊन लढणारी ही वीरांगना भारतीय स्त्रीशक्तीचे प्रतीक बनली.

**राष्ट्रप्रेम आणि संघटन कौशल्य**

राणी लक्ष्मीबाई यांचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी विविध भारतीय राजे आणि संस्थानिक यांना ब्रिटिशांविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले. अलीकडेच सापडलेल्या त्यांच्या दुर्मीळ पत्रातूनही भारतीय शासकांनी एकजूट राखावी आणि ब्रिटिशांच्या फोडा-आणि-राज्य करा नीतीला बळी पडू नये, असा संदेश त्यांनी दिल्याचे दिसून येते. हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि राष्ट्रहिताच्या विचारांचे द्योतक आहे.

**बलिदान आणि अमर वारसा**

ग्वाल्हेरजवळील युद्धात १८ जून १८५८ रोजी राणी लक्ष्मीबाई वीरमरण पावल्या. वयाच्या अवघ्या तेवीस-चोवीसाव्या वर्षी त्यांनी देशासाठी प्राणार्पण केले. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे शौर्य भारतीय स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणाशक्ती बनले. कवयित्री सुभद्रा कुमारी चौहान यांनी आपल्या प्रसिद्ध कवितेत राणींच्या पराक्रमाचे वर्णन करताना लिहिलेले शब्द आजही प्रत्येक भारतीयाच्या ओठांवर आहेत 'खूब लड़ी मर्दानी, वह तो झाँसी वाली रानी थी.' त्यांच्या जीवनकथेतून स्त्री-सक्षमीकरण, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळते.

राणी लक्ष्मीबाई यांचे जीवन हे धैर्य, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांनी स्त्रियांच्या सामर्थ्याला नवे परिमाण दिले आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणादायी दिशा दिली. स्मृतिदिनानिमित्त त्यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन..!

# संघर्षातून घडलेला महान धावपटू : मिल्खा सिंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रीडा इतिहासातील काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने देशाचे नाव जगभरात उज्ज्वल केले. अशाच महान खेळाडूंमध्ये अग्रक्रमाने घेतले जाणारे नाव म्हणजे मिल्खा सिंग. १८ जून हा त्यांचा स्मृतिदिन. या निमित्ताने भारतीय ॲथलेटिक्सला नवी ओळख देणाऱ्या या महान धावपटूच्या कार्याचा आणि संघर्षमय जीवनप्रवासाचा गौरवपूर्वक आढावा घेणे आवश्यक ठरते.

**संघर्षातून घडलेला महान धावपटू**

मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी तत्कालीन ब्रिटिश भारतातील गोविंदपुरा येथे झाला. १९४७ च्या भारत-पाकिस्तान फाळणीच्या काळात त्यांनी आपल्या कुटुंबातील अनेक सदस्यांना गमावले. हिंसाचार, विस्थापन आणि दारिद्र्य यांचा सामना करत ते भारतात आले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभारी घेत त्यांनी आपल्या आयुष्याला नवी दिशा दिली. भारतीय सैन्यात भरती झाल्यानंतर त्यांच्या धावण्याच्या क्षमतेकडे लक्ष वेधले गेले. सैन्यातील कठोर प्रशिक्षणाने त्यांच्या प्रतिभेला योग्य वाव मिळाला आणि याच काळात एका जागतिक दर्जाच्या धावपटूचा जन्म झाला.

**राष्ट्रीय स्तरावरील उदय**

१९५० च्या दशकात मिल्खा सिंग यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत स्वतःचे स्थान निर्माण केले. २०० मीटर आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यतींमध्ये त्यांचे वर्चस्व निर्माण झाले. त्यांच्या वेग, सहनशक्ती आणि जिद्दीमुळे ते भारतीय ॲथलेटिक्सचे प्रमुख चेहरा बनले.

**आंतरराष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय**



**कामगिरी**

१९५८ राष्ट्रकुल स्पर्धेतील ऐतिहासिक सुवर्णपदक मिल्खा सिंग यांनी १९५८ मध्ये ब्रिटीश एम्पायर ॲण्ड कॉमनवेल्थ गेम्स १९५८ मध्ये ४४० यार्ड धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास घडविला. राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारे ते स्वतंत्र भारतातील पहिले भारतीय पुरुष खेळाडू ठरले. ही कामगिरी भारतीय क्रीडा इतिहासातील एक मैलाचा दगड मानली जाते. त्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय ॲथलेटिक्सची ओळख निर्माण करण्यात या यशाचा मोठा वाटा होता.

**१९५८ आशियाई क्रीडा स्पर्धांतील दुहेरी सुवर्णयश**

त्याच वर्षी १९५८ एशियन गेम्समध्ये त्यांनी २०० मीटर आणि ४०० मीटर या दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके जिंकली. या दुहेरी यशामुळे ते आशियातील सर्वोत्तम धावपटूंमध्ये गणले जाऊ लागले.

**टफ्लाइंग सिख' ही उपाधी**

१९६० मध्ये पाकिस्तानमध्ये झालेल्या एका स्पर्धेत त्यांनी नामांकित पाकिस्तानी धावपटू अब्दुल खालिक यांचा पराभव केला. त्यांच्या वेगाने प्रभावित होऊन तत्कालीन पाकिस्तानी राष्ट्रपती अयुब खान यांनी त्यांना 'फ्लाइंग सिख' ही उपाधी दिली. पुढे हीच उपाधी त्यांच्या नावाची कायमस्वरूपी ओळख बनली.

**रोम ऑलिम्पिक १९६० : पदक हुकले, पण इतिहास घडला**

मिल्खा सिंग यांच्या कारकिर्दीतील सर्वांत चर्चित क्षण म्हणजे १९६० समर ऑलिम्पिकमधील ४०० मीटर अंतिम शर्यत. त्यांनी अत्यंत उत्कृष्ट धाव घेत चौथे स्थान मिळविले. कांस्यपदक केवळ काही क्षणांच्या फरकाने हुकले. पदक न मिळाल्याची खंत त्यांना आयुष्यभर राहिली; मात्र त्यांनी त्या स्पर्धेत केलेली वेळ अनेक दशकांपर्यंत भारतीय विक्रम म्हणून कायम राहिली. भारतीय ॲथलेटिक्सच्या इतिहासात ही कामगिरी आजही प्रेरणादायी मानली जाते.

**स्मृतिदिनाचे महत्त्व**

१८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारतीय क्रीडा क्षेत्राने एक महान प्रेरणास्रोत गमावला. मात्र त्यांची जिद्द, संघर्ष आणि राष्ट्राभिमान यांचा वारसा आजही भारतीय खेळाडूंना प्रेरणा देत आहे. मिल्खा सिंग यांचे जीवन हे संघर्षावर मात करून यश संपादन करण्याच्या मानवी क्षमतेचे विलक्षण उदाहरण आहे. फाळणीतील दुःख, दारिद्र्य आणि प्रतिकूल परिस्थिती यांवर विजय मिळवत त्यांनी जगभर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकावला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन..!

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मुश्किलें थीं पर नहीं मानी हार, पहले जेईई और फिर यूपीएससी टॉपर बना चायवाले का बेटा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अगर मेहनत सही दिशा में की जाए तो कुछ भी हासिल किया जा सकता है। कहा जाता है कि सपने पूरे करने से पहले सपने देखना जरूरी है। हम जो सोच सकते हैं तो कर सकते हैं और हम वह सोच सकते हैं जो हमने आज तक नहीं सोचा। ऐसा है कि कुछ कर दिखाया है राजस्थान के लाल ने। संघर्ष बहुत था पर चायवाले के बेटे के कदम नहीं रुके और सबसे कठिन प्रतियोगी परीक्षा यूपीएससी में झंडा गाड़ दिया। आइए जानते हैं इस सफलता की कहानी के बारे में विस्तार से जो आपके प्रेरणा और आत्मविश्वास से भर देगी।

### जैसलमेर के हैं निवासी


रिपोर्ट्स और रिसर्च के मुताबिक, राजस्थान के

**सक्सेस स्टोरी**

जैसलमेर जिले के एक छोटे से गांव में जन्मे देशलदान रतनू का बचपन संघर्षों से भरा था। उनके पिता एक चाय की दुकान चलाते थे और परिवार की आर्थिक हालत बहुत कमजोर थी। सात भाई-बहनों में से सिर्फ देशल और उनके बड़े भाई ने ही स्कूल की पढ़ाई की, बाकी बच्चे मजदूरी या दुकान पर मदद करते थे।

### पढ़ाई के साथ मुश्किलें भी आईं

देशल ने १०वीं तक की पढ़ाई एक सरकारी हिंदी मीडियम स्कूल से की। इसके



बाद वो कोटा गए और १२वीं के बाद जेईई क्लियर करके आयआयआयटी जबलपुर में दाखिला लिया। इंजीनियरिंग करते समय ही उन्होंने तय कर लिया था कि वे यूपीएससी की तैयारी करेंगे, लेकिन कोचिंग के पैसे नहीं थे और इसलिए उन्होंने खुद से तैयारी की।

### भाई की मौत बनी प्रेरणा

देशल के बड़े भाई भारतीय नौसेना में थे। ड्यूटी के दौरान उनकी मौत हो गई, जो परिवार के लिए बहुत बड़ा झटका था। लेकिन देशल ने इसे कमजोरी नहीं बनने दी, बल्कि यही उनकी ताकत और प्रेरणा बन गई।

### बिना कोचिंग के बने आयएएस

कठिन हालातों, आर्थिक तंगी और संसाधनों की कमी के बावजूद देशल ने हार नहीं मानी। उन्होंने २०१७ में पहली बार में यूपीएससी परीक्षा पास की और ८२वीं रैंक लाकर आयएएस अधिकारी बन गए। सबसे खास बात यह है कि उन्होंने यह सफलता हिंदी मीडियम से और बिना कोचिंग के हासिल की।

### छात्रों के लिए संदेश

देशलदान रतनू की कहानी हमें सिखाती है कि अगर आपके इरादे मजबूत हों तो कोई भी मुश्किल आपको रोक नहीं सकती। उनकी मेहनत, लगन और आत्मविश्वास से हर छात्र को सीख लेनी चाहिए।

# लिंबू मिरची बांधण्यामागचे शास्त्र काय आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**‘अलक्ष्मी’ दारातून खरेच परत जाते का?**



नवीन गाडी घेतली किंवा आमावास्येला घरी, वाहनांना आपण लिंबू मिरची बांधतो, ही प्रथा फार प्राचीन आहे या पाठीमागे जरी लोकश्रद्धा असली तरी वैज्ञानिक कारण देखील आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार संपत्तीची देवी ‘लक्ष्मी’ यांची एक मोठी बहीण आहे, जिचे नाव ‘अलक्ष्मी’, अलक्ष्मी ही जिथे जाते तिथे गरिबी, भांडणे आणि संकटे घेऊन जाते. त्यामुळे तिला घरात येण्यापासून रोखणे गरजेचे असते.

अलक्ष्मीला तिखट, आंबट आणि कडू वस्तू अत्यंत आवडतात. जेव्हा घराच्या किंवा दुकानाच्या मुख्य दारावर लिंबू आणि तिखट मिरची टांगली जाते तेव्हा दारात आलेली अलक्ष्मी तिचे आवडते अन्न दारातच खाते आणि तिथूनच निघून जाते, अशी धारणा आहे. पण वैज्ञानिक कारण पाहिले तर लिंबू आणि मिरचीमध्ये सायट्रिक ॲसिड आणि कॅप्सेसिनसारखे तीव्र घटक असतात. जेव्हा सुईने लिंबू आणि मिरची एकत्र ओवली जाते तेव्हा त्यातून एक विशिष्ट सुगंध हवेत पसरतो.
हा सुवास घर किंवा दुकानाच्या परिसरात माश्या, डास, कोळी आणि इतर विषारी कीटकांना आत येण्यापासून रोखतो. पूर्वी जंतुनाशक स्प्रे नव्हते, तेव्हा हे उत्तम कीटकनाशकाचे काम करायचे.

जुन्या काळी लोक जंगलातून प्रवास करायचे. जर एखाद्याला वाटेत साप किंवा विंचू चावला, तर त्याला मिरची खायला दिली जायची. जर मिरची तिखट लागली नाही, तर समजायचे की विषाचा शरीरावर परिणाम झाला आहे तसेच रस्त्यात विहिरीचे पाणी पिण्यायोग्य आहे की नाही, हे तपासण्यासाठी पाण्यात लिंबाचा रस टाकला जायचा कारण लिंबाचे आम्ल जंतू मारण्यास मदत करते.

काळाच्या ओघात विहिरीचे पाणी तपासणे किंवा कीटक पळविण्याचे, विषाची परीक्षा हा व्यावहारिक उपाय मागे पडला. लोकांनी मूळ विज्ञाना ऐवजी धार्मिकतेला जास्त महत्त्व दिले, ज्यामुळे आजही ही प्रथा टिकून आहे.

वैज्ञानिक आणि तार्किक दृष्टिकोनातून ‘अलक्ष्मी’ नावाची कोणतीही शक्ती किंवा व्यक्ती प्रत्यक्षात येत नाही. हा केवळ माणसाच्या मनात ‘नकारात्मक ऊर्जा’ किंवा आजारपण घरात येऊ नये, यासाठी तयार केलेला एक प्रतिकात्मक समज आहे.

# पूर्वी लाल किल्ल्याचा रंग कोणता होता?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लाल किल्ला जुनी दिल्लीतील नेताजी सुभाष मार्गावर स्थित आहे. या ठिकाणी दररोज हजारो पर्यटक किल्ला पाहण्यासाठी येतात. हा किल्ला भारतातील सर्वांत प्रसिद्ध पर्यटनस्थळांपैकी एक मानला जातो.

### बांधकामाची सुरूवात

मुघल बादशाह शाहजहान यांनी १६३९ मध्ये या किल्ल्याचे बांधकाम सुरू केले. त्यांनी हा किल्ला आपल्या राजवाड्यासाठी आणि सत्ता केंद्रासाठी बांधला. त्याकाळात तो अत्यंत भव्य आणि कलात्मक रचनेचा नमुना होता.

### किल्ल्यातील ऐतिहासिक इमारती

या किल्ल्यात दीवान-ए-आम, दीवान-ए-खास, रंग महल आणि मोती मस्जिद यांसारख्या अनेक ऐतिहासिक इमारती आहेत. या सर्व इमारती मुघल वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. आजही त्या पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहेत.

### राष्ट्रीय समारंभाचे ठिकाण

दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी भारताचे पंतप्रधान या किल्ल्यावरून राष्ट्रध्वज फडकावतात. याच ठिकाणाहून देशाला संबोधित केले जाते. त्यामुळे हा किल्ला भारताच्या स्वातंत्र्याचे प्रतीक मानला जातो.

### मूळ नाव आणि रंग

सुरूवातीच्या काळात या किल्ल्याचा रंग पांढरा होता. त्याला ‘किला-ए-मुबारक’ असेही म्हटले जात असे. त्या काळात तो पूर्णपणे लाल रंगाचा नव्हता.

### ब्रिटिशांचा ताबा आणि बदल

ब्रिटिशांनी दिल्लीवर ताबा मिळविल्यानंतर या किल्ल्याची देखभाल सुरू केली. त्यांनी किल्ल्याच्या जीर्ण झालेल्या भिंतींची दुरुस्ती केली. त्यामुळे किल्ल्याच्या मूळ रचनेत काही बदल झाले.

### लाल रंगाची ओळख कशी मिळाली?

दुरुस्ती करताना ब्रिटिशांनी लाल बलुआ दगडांचा वापर केला. त्यामुळे संपूर्ण किल्ला हळूहळू लाल रंगाचा दिसू लागला. त्यानंतरच हा किल्ला ‘लाल किला’ या नावाने ओळखला जाऊ लागला.



# अमेरिकेतील ७ व्या क्रमांकाच्या सर्वांत श्रीमंत ‘सेल्फ-मेड’ महिला

## भारतीय वंशाच्या जयश्री उल्लाल यांची प्रेरणादायी कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय वंशाच्या जयश्री उल्लाल यांनी स्वतःच्या कर्तृत्वावर अमेरिकेतील सर्वांत श्रीमंत महिलांमध्ये स्थान मिळविले आहे. ‘अरिस्टा नेटवर्कस्’ या कंपनीच्या नेतृत्वाखाली त्यांनी एक छोटा स्टार्टअप जागतिक स्तरावरील नेटवर्किंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी बनविला.

### फोर्ब्सच्या यादीत ७ वे स्थान

२०२६ मधील America's Richest Self-Made Women २०२६ या फोर्ब्सच्या प्रतिष्ठित यादीत जयश्री उल्लाल यांना ७ वे स्थान मिळाले आहे. त्यांची एकूण संपत्ती सुमारे ६८० कोटींची असून त्या या यादीतील सर्वाधिक श्रीमंत भारतीय वंशाच्या महिला ठरल्या आहेत.



### लंडनमध्ये जन्म, दिल्लीत शिक्षण

जयश्री उल्लाल यांचा जन्म लंडन येथे भारतीय पालकांच्या घरी झाला. त्यांचे बालपण आणि शिक्षण न्यू दिल्ली येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्या अमेरिकेत गेल्या आणि सॅनफ्रान्सिस्को स्टेट युनिव्हर्सिटीमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी तसेच संत क्लारा युनिव्हर्सिटीमधून इंजिनिअरिंग मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

### सिस्कोमध्ये घडले नेतृत्व

जयश्री यांनी सुरूवातीला ॲडव्हास मायक्रो डिव्हायसेस (एएमडी) आणि फेअरचाइल्ड सेमिकंडक्टर येथे काम केले. त्यानंतर त्या सिस्को सिस्टीममध्ये दाखल झाल्या. जवळपास १५ वर्षे त्यांनी सिस्कोमध्ये विविध वरिष्ठ पदांवर काम करत मोठ्या तंत्रज्ञान व्यवसायाचे व्यवस्थापन शिकले.

### २००८ मधील धाडसी निर्णय

२००८ मध्ये त्यांनी सुरक्षित आणि प्रतिष्ठित सिस्कोची नोकरी सोडून ‘अरिस्टा नेटवर्कस्’ या छोट्या स्टार्टअपमध्ये सीईओ म्हणून प्रवेश केला. त्यावेळी कंपनीकडे महसूल नव्हता आणि कर्मचारीसंख्या ५० पेक्षाही कमी होती. मात्र, जयश्री यांना क्लाउड कॉम्प्युटिंग आणि डेटा सेंटर क्षेत्रात मोठी क्रांती होणार असल्याचा विश्वास होता. त्यांनी कंपनीची रणनीती त्यानुसार आखली. त्यांचे हे दूरदृष्टीचे पाऊल यशस्वी ठरले आणि अरिस्टाचे नेटवर्किंग तंत्रज्ञान मोठ्या क्लाउड व एआय कंपन्यांची पसंती बनले.

### ‘आयपीओ’नंतर झपाट्याने वाढ

२०१४ मध्ये अरिस्टा नेटवर्कस्चा आयपीओ आला आणि कंपनीला जागतिक ओळख मिळाली. आज ही कंपनी क्लाउड कॉम्प्युटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यासाठी आवश्यक असलेल्या नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरमधील प्रमुख खेळाडू मानली जाते.

### जागतिक स्तरावर चमकणाऱ्या इतर भारतीय वंशाच्या महिला

**रेशमा केवलरामाणी** : हेल्थकेअर क्षेत्रातील अग्रगण्य नेत्या, व्हर्टेक्स फार्मास्युटिकल्सच्या सीईओ. **गुंजन केडिया** : अमेरिकेतील प्रमुख बँकिंग संस्थांपैकी एक असलेल्या यू. एस. बॅनक्रॉपच्या सीईओ. **रोशनी नादर मल्होत्रा** : भारतीय आयटी क्षेत्रातील प्रभावशाली नेत्या आणि एचसीएल टेक्नॉलॉजीच्या अध्यक्षा. **बेला बजारिया** : नेटफ्लिक्सवरील जागतिक कंटेंट धोरणाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकारी. **लीना नायर** : लक्झरी ब्रँड चॅनलच्या जागतिक सीईओ. **मीना फ्लायन्न** : गोल्डमॅन सॅच्समध्ये ग्लोबल प्रायव्हेट वेल्थ मॅनेजमेंटचे नेतृत्व. **रेव्हथी अद्वैथी** : उत्पादन क्षेत्रातील मोठी कंपनी फ्लेक्सच्या सीईओ.

जयश्री उल्लाल यांची कहाणी ही दूरदृष्टी, तांत्रिक कौशल्य आणि धाडसी निर्णय यांच्या बळावर जागतिक यश मिळविण्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. आज त्या केवळ अमेरिकेतील सर्वांत श्रीमंत सेल्फ-मेड महिलांपैकी एक नाहीत, तर जगभरातील उद्योजक आणि व्यावसायिक महिलांसाठी प्रेरणास्थान बनल्या आहेत.










# गुरुवारबद्दल १० महत्त्वाच्या गोष्टी

## नशीब जागृत करण्यासाठी योग्य वार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू दिनदर्शिकेनुसार कोणतेही कार्य सुरू करण्यासाठी तिथी, वार, नक्षत्र, योग आणि करण पाहणे आवश्यक आहे. यावरून शुभ विवाह आणि मुहूर्त दिसून येतो. वार, तिथी, महिना, लग्न आणि मुहूर्त यांचे संपूर्ण शास्त्र आहे. जे लोक या हिंदू शास्त्रानुसार आपली जीवनशैली अनुकूल करतात, ते सर्व त्रासांपासून वाचतात. चला तर मग जाणून घेऊया काय आहे गुरुवारचे महत्त्व आणि त्याबद्दलच्या १० महत्त्वाच्या गोष्टी.





### १) गुरु ग्रहाचे विज्ञान

गुरुवार हा गुरू ग्रहाचा दिवस आहे. सूर्यमालेतील सूर्याच्या आकारानंतर गुरूचाच क्रमांक येतो. या ग्रहाचा व्यास सुमारे १.५ लाख किलोमीटर आहे आणि त्याचे सूर्यापासूनचे अंतर सुमारे ७७८०००००० किलोमीटर मानले जाते. ते १३ किलोमीटर प्रतिसेकंद या वेगाने सूर्याभोवती ११ वर्षांत एक प्रदक्षिणा घालते. ते १० तासांतच आपल्या अक्षावर फिरते. त्यावर सुमारे १३०० पृथ्वी भार ठेवता येऊ शकते. ज्याप्रमाणे सूर्य उगवतो आणि मावळतो त्याचप्रमाणे गुरू ग्रह ३० दिवसांनंतर पुन्हा उगवतो. उगवल्यानंतर १२८ दिवस सरळ मार्गावर चालतो. मार्गी आल्यानंतर पुन्हा १२८ दिवस परिक्रमा करते आणि त्यानंतर पुन्हा मावळते. गुरुत्वाकर्षण शक्ती पृथ्वीपेक्षा ३१८ पट जास्त आहे.

### २) नवग्रहांमध्ये गुरू श्रेष्ठ

गुरुवारची प्रकृती क्षिप्र असते. हा दिवस ब्रह्मा आणि गुरूचा दिवस मानला जातो. धनू आणि मीन राशीचे स्वामी सूर्य, मंगळ, चंद्र हे अनुकूल ग्रह आहेत, शुक्र आणि बुध हे शत्रू ग्रह आहेत आणि शनी आणि राहू हे सम ग्रह आहेत. नवग्रहांपैकी बृहस्पतीला गुरू ही पदवी प्राप्त झाली आहे. त्याचे मित्र बुध, शुक्र आणि राहू आहेत. बृहस्पती कर्क राशीत वरचा आणि मकर राशीत नीच आहे. लाल किताबानुसार चंद्राच्या संयोगाने गुरूची शक्ती वाढते. दुसरीकडे मंगळ एकत्र असताना गुरूची शक्ती दुप्पट होते. सूर्य ग्रहामुळे गुरूची प्रतिष्ठा वाढते.

### ३) गुरूमुळे मांगलिक कार्य

गुरूचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. सर्व प्रकारच्या संकटांपासून पृथ्वी आणि मानवाचे रक्षण करणारा हा ग्रह आहे. बृहस्पतीचा सहवास सोडणे म्हणजे आत्म्याचे शरीर सोडणे होय. पृथ्वीचे अस्तित्व केवळ गुरू ग्रहामुळे उरले आहे. सूर्य, चंद्र, शुक्र, मंगळानंतर त्याचा पृथ्वीवर होणारा प्रभाव सर्वांत जास्त मानला जातो. गुरू ग्रहाच्या अस्तामुळे मंगळ गुरूपासूनच असल्यामुळे मांगलिक कामेही थांबतात. कारण गुरूमुळेच मंगल होते.

### ४) गुरुवारचा देव ब्रह्मा

ज्योतिषशास्त्रानुसार गुरुवार किंवा गुरू ग्रह महर्षी बृहस्पती आणि भगवान दत्तात्रय यांच्याशी संबंधित आहे. परंतु लाल किताबानुसार भगवान ब्रह्म हे त्याचे देवता आहेत आणि ब्राह्मण, आजोबा, पणजोबा हे त्यांच्याशी संबंधित असल्याचे मानले जाते. पिंपळ, पिवळा रंग, सोने, हळद, हरभराडाळ, पिवळी फुले, केशर, गुरू, पिता, वृद्ध पुजारी, विद्या आणि उपासना ही सर्व गुरूची प्रतीके मानली जातात.

### ५) कुंडलीत गुरू

कुंडलीत त्याचा प्रभाव चौथ्या, पाचव्या आणि नवव्या घरात पडतो. चतुर्थात चांगले फळ देते आणि नवव्यात भाग्य उघडते. कुंडलीत बृहस्पती शुभ असेल तर व्यक्ती कधीही खोटे बोलत नाही. तो त्याच्या सत्यनिष्ठेसाठी ओळखला जातो. डोळ्यांत चमक आणि चेहऱ्यावर चमक. आपल्या ज्ञानाच्या बळावर जगाला झुकविण्याची ताकद असलेल्या अशा व्यक्तीचे अनेक प्रशंसक आणि हितचिंतक असतात. बृहस्पती ग्रह उच्च राशी व्यतिरिक्त २, ५, ९, १२ मध्ये असेल तर शुभ ठरते.

### ५) गुरुवार व्रत केल्याने नशीब खुलते

कुंडलीत गुरू, शुक्र, बुध किंवा राहू कमजोर असल्यास किंवा कोणत्याही प्रकारे दुर्बल असल्यास व्यक्तीने गुरुवारी व्रत करावे. कारण नशीब बृहस्पतीपासूनच जागृत होते. याने विवाह होणे आणि वैवाहिक जीवनात आनंद मिळविणे सोपे आहे. गुरूच दीर्घायुष्य देतो. त्यामुळे गुरुवारचे व्रत करणे आवश्यक आहे. उथळ मानसिकतेच्या लोकांनी गुरुवारी व्रत अवश्य ठेवावे.

### ६) अशुभ बृहस्पतीचे चिन्ह

बृहस्पती दुर्बल असेल तर तो पितृदोष मानला जातो. डोक्याच्या मध्यभागी केस उडू लागतात. शिक्षणात गडबड दिसून येते. डोळा दुखू लागतो. स्वप्नात साप दिसू लागतात. व्यक्तीबद्दल उगाच अफवा पसरतात. घसा आणि फुफ्फुसाच्या आजारात वेदना होतात. जर ते खूप वाईट असेल तर व्यक्तीचे आयुष्य देखील कमी होते.

### ७) मंदिरात जाऊन पूजा करण्याचा वार

हिंदू धर्मात गुरुवार हा रविवारपेक्षा चांगला आणि पवित्र दिवस मानला जातो. तो धर्माचा दिवस आहे. या दिवशी मंदिरात जाणे चांगले मानले जाते. गुरुवारची दिशा ईशान आहे. देवतांचे स्थान उत्तर दिशेला मानले जाते. या दिवशी सर्व प्रकारचे धार्मिक आणि शुभ कार्य लाभदायक असतात, त्यामुळे हिंदू धर्मग्रंथानुसार हा दिवस सर्वोत्तम मानला जातो. त्यामुळे प्रत्येकाने दर गुरुवारी मंदिरात जाऊन पूजा, प्रार्थना किंवा ध्यान करावे.

### ८) गुरुवारची दिशा शूल आणि राहू काल

प्रवासात या युद्धाची दिशा पश्चिम, उत्तर आणि उत्तर मानली जाते. या दिवशी पूर्व, दक्षिण आणि नैऋत्य दिशेला प्रवास करणे वगळले जाते. हा दिवस दुपारी दीड ते तीनपर्यंत असतो.

### ९) गुरुवारी काय करावे

पांढरे चंदन, हळद किंवा गोरोचन यांचा तिलक लावावा. सर्व प्रकारची वाईट व्यसनं सोडण्यासाठी खूप चांगला दिवस, कारण या दिवशी इच्छाशक्ती भरपूर असते. गुरुवारी पापांचे प्रायश्चित्त केल्याने पापांचा नाश होतो, कारण हा दिवस देवी-देवता आणि त्यांचे गुरु बृहस्पती यांचा दिवस आहे. उत्तर, पूर्व, ईशान्य दिशेने प्रवास करणे शुभ ठरतं. धार्मिक, मांगलिक, प्रशासकीय, अध्यापन आणि रचनात्मक कार्यासाठी हा दिवस शुभ आहे. तुम्ही सोने आणि तांबे खरेदी-विक्री करू शकता. या दिवशी घरात धूप दिवा लावावा, विशेषतः गुग्गुळाचा धूप द्यावा. जर तुमचा गुरु अशुभ किंवा कमजोर असेल तर तुम्ही पिंपळावर जल अर्पण करावे. गुरुवारी पिवळी वस्तू खा.

अनेकदा गुरुवारी घरात धूप दिला जातो. या दिवशी अगरबत्ती लावल्याने घरगुती वाद, तणाव आणि निद्रानाश तर दूर होतोच, शिवाय हृदय आणि मेंदूच्या दुखण्यातही आराम मिळतो. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे या दिवशी उदबत्ती लावल्याने अलौकिक मदत मिळते.

### १०) गुरुवारी काय करणे टाळावे

या दिवशी मुंडण करू नका आणि शरीराचे कोणतेही केस कापू नका. नाहीतर मुलांच्या सुखात बाधा येईल. दक्षिण, पूर्व, दक्षिणेकडे प्रवास करण्यास मनाई आहे. गुरुवारी मीठ खाऊ नये. याचा आरोग्यावर परिणाम होतो आणि प्रत्येक कामात अडथळा येतो. या दिवशी दूध आणि केळी खाणे देखील वर्ज्य मानले जाते. या दिवशी कपडे धुणे आणि लादी पुसणे देखील निषिद्ध मानले जाते.

# गुरुवारी कोणत्या झाडाची पूजा करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात केळीच्या झाडाला अतिशय पवित्र मानले आहे. म्हणून केळीच्या झाडाची पूजा केली जाते. शुभ कार्यात देखील केळीच पाने आणि केळीच्या झाडाची पूजा करण्याचे विधान आहे. धर्म मान्यतेनुसार गुरुवारी केळीच्या झाडाची पूजा केली पाहिजे. असे म्हणतात की जो कोणी भक्त गुरुवारी केळीच्या झाडाची पूजा करतो त्याला भगवान श्रीविष्णूंचा आशीर्वाद मिळतो. तसेच केळीच्या झाडाची पूजा केल्याने घरात धन-संपत्ती येते.

अशी आख्यायिका आहे, की केळीच्या झाडात खुद्द भगवान विष्णूंचा वास असतो. गुरुवारी केळीच्या झाडाची पूजा करणाऱ्यावर ते प्रसन्न होतात आणि आपल्या भक्तांना सौख्य, भरभराट, शांती, आनंदाचा आशीर्वाद देतात. केळीच्या झाडाला शुभ आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते.

### वैवाहिक जीवनातील अडथळे दूर होतात

जर आपल्या कुंडलीत गुरूची स्थिती खराब असल्यास आणि आपल्या वैवाहिक जीवनात अडथळे येत असल्यास आपण एखाद्या ज्योतिषाला विचारून बृहस्पती देवाचे उपवास करावेत आणि केळीच्या झाडाची पूजा करावी. असे केल्याने आपल्या कुंडलीत असलेले गुरू ग्रह बळकट होतील आणि लग्नातील अडथळे दूर होतील.

### केळीच्या झाडाखाली दिवा लावा



भगवान विष्णू पिवळे कपडे घालतात. म्हणून त्यांना पीतांबरधारी देखील म्हणतात. गुरुवारी पिवळे कपडे घालून केळीच्या झाडाखाली दिवा लावावा. असे केल्याने भगवान विष्णूंची कृपादृष्टी मिळते.

### गुरुवारी काय करू नये?

गुरुवारी केस धुऊ नये किंवा साबणाचा आणि शॅम्पूचा वापर करू नये. गुरुवारी दररोजची स्वच्छता करण्याव्यतिरिक्त कोणतीही स्वच्छता करू नये. गुरुवारी एखाद्या काळ्या गायीला पिवळे लाडू खाऊ घालावेत. असे केल्याने आपले अडकलेले पैसे मिळतात आणि मालमत्तेच्या वादातून देखील सुटका होते.

# गुरुविना कोण दाखवील वाट?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मागील जन्माची पुण्याई असेल तर योग्य वेळी सद्गुरू आपणास आपोआप भेटतात. काहींना त्रास होतो. माणसाचे भोग संपत आले, की सद्गुरूंचा पत्ता मिळतो. काहींना अगोदर मिळतो, कारण त्यांची मागील जन्माची पुण्याई असते. काहींना जाणीवपूर्वक मिळतो, तर काहींना अपघाताने पत्ता मिळतो. पण त्यांचे मन तयार होत नाही. काही जण येण्यास इच्छुक असतात. पण पाठीमागची काळजी, चिंता, पाप हे येऊ येऊ देत नाही! काही जण त्या पत्त्यावर येतात. पण त्या मार्गात अडथळे येतात. काही जण भरकटतात, फसतात. ही त्यांची परीक्षा असते. कारण त्यांचे भोग हे त्यांना पोहोचू देत नाहीत. भोग संपत आले की गुरू भेटतातच.

आधी करावी सेवा मग मिळतो मेवा. आधी करावी चाकरी मग मिळते सद्गुरूंची सेवेची भाकरी. आपल्या गुरूंवरील श्रद्धा, विश्वास ठाम ठेवा. कोणत्याही परिस्थितीमध्ये चुकीचा मार्ग अवलंब करू नका. भलत्याच वाटेला जाऊ नका. वेळ लागेल पण आपले गुरू आपले चांगलेच करतील हा विश्वास ठाम ठेवा. आणि शेवटी एक लक्षात ठेवा, की तुम्ही कोठेही जा, काहीही उपाय करा, पण या ब्रम्हांडनायकाच्या परवानगीशिवाय झाडाचे पान सुद्धा हालत नाही हे मात्र लक्षात ठेवा. मग पाहा आपण काय करायचे ते. भलत्या वाटेने जायचे की आपल्या गुरूंच्या वाटेने जायचे. खरे पाहता गुरूशिवाय शिष्य नाही, झोळी-खप्पराशिवाय भिक्षा नाही, त्रिशूळ- चिमट्याशिवाय शस्त्र नाही, कुबडी-रुद्राक्ष माळशिवाय साधना नाही, कपाळावर भस्म (विभूती) शिवाय संरक्षण नाही.



सर्व इंद्रियांची ताकद पूर्ण एकवटून सद्गुरू मुखातून मिळालेले ज्ञान आपल्याला पेलता आले पाहिजे आणि मग त्याच कृतीत रूपांतरही करता आले पाहिजे. ध्यान या विषयावर आपण नुसतेच ऐकत किंवा वाचत राहिलो तर त्याचा काही उपयोग नाही. जो ते ज्ञान प्रत्यक्ष कृतीत उतरवेल त्यालाच त्याचा उपयोग होईल. ध्यान हे एक तप आहे. एका जागी एका वेळी कोणतेही काम न करता शांत बसून राहणे हे सगळ्यात मोठे तप आहे. एरवी मनुष्य चित्रपटगृहात कित्येक तास काही काम न करता शांत बसू शकेल. परंतु सिनेमा बघणे आणि ध्यान करणे यात मोठा फरक आहे. कोणी म्हणेल, की अहो मी तीन तास एका जागी बसून सिनेमा बघतो. म्हणजे मी ध्यानच करतो. पण हे ध्यान नव्हे, कारण खऱ्या ध्यानात आपल्या समोर कोणतेही चित्र निर्माण होत नाही किंवा कुठला आवाजही ऐकू येत नाही. म्हणजे काही 'नसणे' हेच तिथे 'असते' आणि त्यालाच ध्यान म्हणतात. सुरूवातीच्या काळात प्रतिकावर आणि त्यानंतरच्या काळात प्रतिकाविना घडू शकणारे ध्यान आपल्याला अपेक्षित आहे आणि आवश्यकही आहे.

गुरूंची सेवा करणे, गुरूंनी दिलेली साधना 'नित्यनेमाने' करणे, त्यामध्ये खंड पडता कामा नये, तसेच शक्यतो वेळ चुकवू नये. कारण आपण जसजशी साधना नेमाने करू लागतो, "गुरुदेव त्या वेळेला आपली वाट पाहत असतात ही भावना एकदा का मनामध्ये रुजली की साधनेमध्ये सातत्य आपोआप येऊ लागते. आज झोप झाली नाही, आज बरे वाटत नाही म्हणून साधनेची वेळ चुकवू नये. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे श्रेष्ठ गुरूंचे चरण आपल्याला मिळाले, ही त्यांची आपल्याप्रती दया भावना आहे हे लक्षात असू द्यावे. बाकी गुरूंची आपल्याकडून काहीच अपेक्षा नसते. भगवंताप्रती आपला भाव कसा दृढ होईल हेच ते पाहत असतात. आपल्या प्रापंचिक समस्या त्यांच्या चरणी दृढ झाल्यावर आपोआपच मार्गी लागतात. त्यांना सांगायची गरजच लागत नाही. पण त्यांच्याविषयी तेवढी श्रद्धा आणि निष्ठा आपल्या मनात असली पाहिजे. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगी ते आपली परीक्षा पाहत असतात. आपली 'निष्ठा' कुठे डळमळत तर नाही ना! त्यामुळे सदैव त्याचे स्मरण करून आयुष्यात घडणाऱ्या प्रसंगांना सामोरे जावे. आपला सर्व भार आपल्या निष्ठेप्रमाणे ते घेतातच. फक्त आपले आचरण, विचार यांना आपणच सांभाळायचे आहे. एक मात्र नक्की गुरुविना कोण दाखवील वाट?

# श्री स्वामी समर्थांचे नऊ गुरुवार व्रत कसे कराल?

## व्रताचे नियम, पूजाविधी, व्रतकथा जाणून घेऊया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री स्वामी समर्थ महाराजांचे भक्त नऊ गुरुवारचे व्रत करत असतात. स्वामींचे हे नऊ गुरुवारचे व्रत केल्याने मनातील इच्छा पूर्ण होतात. तसेच जीवनात कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत नाही, अशी अनेक भाविकांची श्रद्धा आहे. तसेच जीवनात यश मिळविण्यासाठी व कुटुंबात सुख-समृद्धी नांदावी यासाठी भाविक गुरुवारचे हे व्रत करीत असतात.



**श्री स्वामी समर्थांचे नऊ गुरुवारचे व्रत**

या व्रताची सुरूवात कोणत्याही महिन्यातील गुरुवारपासून करता येते. नवव्या गुरुवारी व्रताचे उद्यापन केले जाते. आपल्या इच्छित कार्याचा संकल्प करून व्रताला आरंभ करावा. पहिल्या गुरुवारी व्रत संकल्प करावा.

व्रतासाठी लागणारे साहित्य : हळद-कुंकू, अक्षता, तुपाचा दिवा, कापसाची दोन वस्त्रे, स्वामींना पांघरायला भगवे वस्त्र, गूळ-खोबरे, ताम्हन, तांब्या, पळी, अष्टगंध, जानवे, हिना, अत्तर, चंदन, विविध फुले (जास्वंद, चाफा, गुलाब, दूर्वा, बेल, १ जुडी तुळस, इतर फुले).

पूजा विधी : व्रताला प्रारंभ करावयाच्या गुरुवारी सुर्योदयाच्या वेळेस स्नान करुन शुचिर्भुत व्हावे. स्वतः आसनावर बसून कपाळी अष्टगंधाचा टिळा लावावा. नित्याची देवपूजा करावी. घरातील देवासमोर एक नारळ, विडा ठेवून (त्यावर नाणं आणि सुपारी) नमस्कार करावा. वडील मंडळींनाही नमस्कार करावा. पूजेला प्रारंभ करावा.

फक्त पहिल्या गुरुवारी उजव्या हातात गंधयुक्त अक्षता, पळीभर पाणी, तुळशीपत्र घेऊन आपल्या इच्छित कार्याचा संकल्प करावा. जमिनीवर चौरंग ठेवून सभोवती रांगोळी काढावी. मध्ये स्वस्तिक काढून त्यावर चौरंग ठेवून केशरी, लाल अथवा पिवळे वस्त्र अंथरुण मध्यभागी वडाचे पान पालथे ठेवून त्यावर गंधाक्षता, तुळशीपत्र ठेवून श्री स्वामी महाराजांची मूर्ती अथवा फोटो ठेवावा.

(वडाच्या पानाचा देठ भिंतीकडील बाजूस असावा) आपल्या उजव्या बाजूला चौरंगावर गंधाक्षता ठेवून त्यावर गणपती पूजनाकरिता सुपारी ठेवावी.

उजव्या बाजूला घंटी आणि डाव्या बाजूला शंख ठेवायचा आहे. चौरंगाच्या शेजारी समई लावावी. सुंगधी अगरबत्ती धूप लावावा. चौरंगावर एका बाजूला एक नारळ व पानाचा विडा ठेवावा.

संकल्प : मम आत्मनः श्रुतिस्मृतिपुरानोक्तफल प्रात्यर्थम, मम सकल कुंटुंबिनाम, क्षेम, स्थैर्य, आयु, आरोग्य, ऐश्वर्यभीवृध्दार्थम, पुत्रपौत्र, संततिवृध्दी, अप्राप्तलक्ष्मीप्राप्त्यर्थम, प्राप्तलक्ष्मीचिरकाल संरक्षणार्थम्, अदित्यादि सकल ग्रहपीडाशांतर्थम् एवं सकल कामनासिध्दिद्वारा धर्मार्थम् मोक्षफल प्राप्त्यर्थम् श्रीस्वामी समर्थ देवता पूजनं एवं व्रतकथा श्रवणंच करिष्ये।

असे म्हणून हातातील पाणी ताम्हनात सोडावे. गणपतीचे ध्यान करुन ॐ गं गणपतये नमः। एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धिमही, तंन्नो दंती प्रचोदयात।। असा मंत्र म्हणून गणपती पूजनाकरिता मांडलेल्या सुपारीवर एक पळी पाणी अष्टगंध मिश्रीत जल अर्पण करून सुपारीला चंदन लावावे. हळद-कुंकू वाहून दूर्वा, लाल फुले, बेल, कापसाची दोन वस्त्रे, जानवे, अक्षता अर्पण करुन नमस्कार करावा. धूप-दीप-अगरबत्ती दाखवावी. तुपाचा दिवा ओवाळावा. गूळ-खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा.

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ, निर्विघ्नं कुरुमेदेव सर्वकार्येषु सर्वदा ।। असे म्हणून गणपती बाप्पांना नमस्कार करावा. घंटा वाजवावी. घंटेला हळद-कुंकू, अक्षता, गंध, फूल अर्पण करून अगरबत्ती, धूप दाखवावा. दीप ओवाळून घंटा वाजवावी. नमस्कार करावा.

**श्री स्वामी समर्थ पंचोपचार पूजा**

ॐ नमो श्री स्वामी समर्थाय आवाहनार्थे एवं आसनार्थे अक्षतान समर्पयामि। असे म्हणून स्वामींच्या मूर्तीला अक्षता अर्पण कराव्यात.

ॐ नमो श्री स्वामी समर्थाय विलेपनार्थे चंदन, अलंकारार्थे अक्षतान् एवं सौभाग्यद्रव्यम् हरिद्रांकुंकुमम् समर्पयामि।

असे म्हणून मूर्तीला चंदन, हळद- कुकू लावून अक्षता अर्पण करून नमस्कार करावा.

ॐ नमो श्री स्वामी समर्थाय यज्ञपवीतम् एवम् वस्त्रम् समर्पयामी ।

असे म्हणत स्वामींना जानवे व भगवे वस्त्र अर्पण करून नमस्कार करावा.

ॐ नमो श्री समर्थाय रुतुकालोभ्दवपुष्पाणि एवं सुंगधिद्रव्यंम् समर्पयामी।

असे म्हणून स्वामींना गुलाब, मोगरा, जास्वंद, सोनचाफा अशी फुले अर्पण करून हिना अपत्तर लावून नमस्कार करावा.

ॐ नमो स्वामी समर्थाय धूप, दीप समर्पयामी ।

असे म्हणून स्वामींना सुगंधी धूप दाखवून, तुपाचा दिवा लावून नमस्कार करावा.

ॐ नमो स्वामी समर्थाय मुखवासार्थे पुगीफलतांबूल, नारीकेलमहाफलम् एवं महादक्षिणाम् समर्पयामि ।

असे म्हणून विड्यावर, नारळावर आणि फळांवर पळीभर पाणी सोडावे. हळद-कुंकू, चंदन, फुले अर्पण करून दक्षिणेवर पाणी सोडून नमस्कार करावा.

**(क्रमशः)**

### श्रीगुरू स्वामी समर्थ अष्टोत्तरशतनामावली

**स्वामींच्या पुढील प्रत्येक नामाबरोबर एक एक तुळशीपत्र मूर्तीला अर्पण करावे. अष्टोत्तरशत नामावली प्रारंभ करिष्ये...**

ॐ श्री स्वामी समर्थाय नमः ॐ श्री महाविष्णवे नमः
ॐ विश्वपालकाय नमः ॐ महादेवाय नमः
ॐ विश्वमूर्तये नमः ॐ परमेश्वराय नमः
ॐ कामधेनुरुपाय नमः ॐ दीनानाथाय नमः
ॐ करुणासागराय नमः ॐ अवधूताय नमः
ॐ भरतखंडनिवासिने नमः ॐ सुखधामवासिने नमः
ॐ मूळपुरुषाय नमः ॐ वटवृषाय नमः
ॐ देवाधिदेवाय नमः ॐ भक्तिप्रियाय नमः
ॐ शुध्द ब्रम्हचैतन्याय नमः ॐ समर्थाय नमः
ॐ करुणाकंदाय नमः ॐ त्रैलोक्याधिपतये नमः
ॐ अनंताय नमः ॐ दत्तनगरवासिने नमः
ॐ अक्कलकोटवासिने नमः ॐ त्राताय नमः
ॐ कलियुगे इच्छितदातये नमः
ॐ संसार श्रमनाशकाय नमः
ॐ विश्वविराटस्वरुपाय नमः ॐ भक्तवत्सलाय नमः
ॐ मृत्युंजयाय नमः ॐ कल्पवृक्षरुपाय नमः
ॐ दयासागराय नमः ॐ पतितपावनाय नमः
ॐ त्रिविधतापनाशकाय नमः
ॐ चतुरधामवासिने नमः
ॐ योगक्षेमवाहिने नमः ॐ दाताय नमः
ॐमोक्षदाताय नमः ॐ श्रीपतये नमः
ॐ शिवविष्णूरुपाय नमः ॐ ब्रम्हज्योतीरुपाय नमः
ॐ पुराणपुरुषाय नमः ॐ दिगंबराय नमः
ॐ सत्यज्ञानरुपाय नमः ॐ श्रीगुरु स्वयंदत्ताय नमः
ॐ शेषनारायणाय नमः ॐ सदाशिवाय नमः
ॐ त्रैमूर्तिरुपाय नमः ॐ विश्वात्माय नमः
ॐ मंगलमूर्तये नमः ॐ त्रिकालज्ञानाय नमः
ॐ अयोनिसंभवे नमः ॐ मुलाधाराय नमः
ॐ विश्वसुत्रधाराय नमः ॐ जगन्नाथाय नमः
ॐ अच्युतानंदाय नमः ॐ क्षमामूर्तये नमः
ॐ आआदिनारायणाय नमः
ॐ सघगुणनिर्गुणाय नमः
ॐ विश्वव्यापकाय नमः ॐ प्रकृतिपुरुषाय नमः
ॐ सर्वसाक्षीभूताय नमः ॐ देवरुपाय नमः
ॐ सर्वसौख्यदायकाय नमः ॐ वरदमूर्तये नमः
ॐ कर्मफलदातये नमः ॐ आजानुबाहवे नमः
ॐ अनंतसिध्दिदायकाय नमः
ॐ कोटीब्रम्हांडनायकाय नमः
ॐ नृसिंहभानाय नमः ॐ क्षिरसागरवासिने नमः
ॐ प्रपंच परमार्थरुपाय नमः ॐ सर्वेश्वराय नमः
ॐ स्वयंसिध्दीदायकाय नमः
ॐ विश्वकुटुंबवत्सलाय नमः
ॐ त्रैलोक्यनाथाय नमः ॐ त्रैगुण्यरहिताय नमः
ॐ दशअवताराय नमः ॐ ॐकाररुपाय नमः
ॐ चतुरयुगे अवताराय नमः ॐ यज्ञरुपाय नमः
ॐ अनंतशिर्षाय नमः ॐ अनंतभूजाय नमः
ॐ पुण्यस्मरणाय नमः ॐ पूर्णब्रम्हरुपाय नमः
ॐ भवसागर तारकाय नमः ॐ पूर्णधामाय नमः
ॐ शांतिसागराय नमः
ॐ द्वादशआदित्य जननीये नमः
ॐ वटपत्रशयनी नारायणाय नमः
ॐ विश्वसंसार प्रतिबिंबरुपाय नमः
ॐ संकल्प दिक्षादायकाय नमः
ॐ विश्वकालचक्र पूर्णविरामाय नमः
ॐ सकलतीर्थरुपाय नमः ॐ सर्वैश्वराय नमः
ॐ अधर्मनाशकाय नमः ॐ त्रिभूव तारकाय नमः
ॐ विश्वंभराय नमः ॐ रुद्ररुपाय नमः
ॐ सदासर्वदा चिंनमूर्तये नमः
विश्वकल्याणअवताराय नमः
ॐ कलियुगे लीला अवताराय नमः
ॐ जराजन्मव्याधि विनाशाय नमः
ॐ विश्वगुरत्रै नमः ॐ ईश्वराय नमः
ॐ पुरुषोत्तम क्षेत्रवासिने नमः ॐ विश्वपिताय नमः
ॐ श्रीहरि स्वामीराजाय नमः ॐ आद्यपुरुषाय नमः

**॥इति श्रीगुरू स्वामी समर्थ अष्टोत्तरशतनामावली विश्वगुरू भगवत श्री स्वामी समर्थार्पणमस्तु॥**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**